**शिक्षण विभाग (प्राथमिक ) जिल्हा परिषद, नांदेड**
**रेल्वे स्टेशन रोड,जिल्हा व सत्र न्यायालयासमोर वजिराबाद,**
**नांदेड ४३१६०१.**

**वेबसाईट :-** *www. zpnanded.in* **ई-मेल :-** ssananded1@gmail.com

जा.क्र.जिपनां/शिअप्रा/प्रा-१९/ **२४१८/** २०२६ दिनांकः **१७.०४.२०२६**

**प्रति,**

**सर्व गट शिक्षणाधिकारी,**
**पंचायत समिती,नांदेड.**

**विषय-** **सार्वत्रिक बदल्या -2026 प्राथमिक स्वरूपात वास्तव्य सेवा ज्येष्ठता सूची आक्षेप व हरकती साठी प्रसिध्द करणे बाबत.**

संदर्भ -
1. महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जल संधारण विभाग, शासन निर्णय, क्रं जिपब-414/प्र.क्र-112/आस्था-14/ दिनांक 15.05.2014
2. सामन्य प्रशासन विभाग, जिल्हा परीषद, नांदेड यांचे पत्र क्रं 944 दिनांक 30.03.2026
3. या कार्यालयाचे पत्र क्र 2235 दिनांक 07.04.2026

उपरोक्त विषयानुषंगाने संदर्भाधिन पत्रानुसार आपणास सूचित करण्यात येते की, नांदेड जिल्हा परीषद शिक्षण विभाग प्राथमिक अंतर्गत विस्तार अधिकारी शिक्षण, अराजपत्रित मुख्याध्यापक, माध्यमिक शिक्षक (माध्यम —मराठी/उर्दू), शारीरीक शिक्षक, चित्रकला शिक्षक व केंद्र प्रमुख इ. संवर्गाच्या संदर्भीय पत्रानुसार शासनाने दरवर्षी बदली प्रक्रिया राबविणेबाबत निर्देश दिले आहेत.

विस्तार अधिकारी शिक्षण, अराजपत्रित मुख्याध्यापक, माध्यमिक शिक्षक (माध्यम -मराठी/उर्दू) शारीरीक शिक्षक, चित्रकला शिक्षक व केंद्र प्रमुख इ. संवर्गाच्या बदल्या करण्याबाबत वरील पत्रान्वये सामान्य प्रशासन विभागाने वेळापत्रक निश्चित करून दिले असून त्या नुसार बदली प्रकिया पार पाडली जाणार असुन त्यानुसार वरील संवर्गाची दिनांक 31.05.2026 रोजीची प्राथमिक वास्तव्य जेष्ठता यादी तयार करण्यात आली आहे.

सदर प्राथमिक स्वरूपातील यादीत काही आक्षेप हरकती असल्यास पुराव्यासह दिनांक 27.04.2026 पर्यंत या कार्यालयात प्रा-19 शाखेस सादर करावी. तदनंतर आलेल्या आक्षेपाचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

सदर यादी जिल्हा परीषदेच्या WWW.ZPNANDED.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येत आहे.

**सोबत- प्राथमिक वास्तव्य सेवाजेष्ठता यादी -2026**

**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परीषद, नांदेड.करिता**

**स्थळ प्रतिवर मा.मु.का.अ.यांची स्वाक्षरी असे/-**